सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-२/२४५
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर. दि.१३/०८/२०२१.

प्रति,

१) कामगार कल्याण व जनता संपर्क अधिकारी
२) संगणक प्रोग्रामर

**विषय :-** जाहीर प्रसिध्दीकरण करणेबाबत...

सोलापूर महानगरपालिका, उदयान विभाग अंतर्गत म.गांधी प्राणी संग्रहालयाकडील **संचालक** पदावर सदर पदाचे शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अथवा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून थेट मुलाखतीव्दारे निवड करणेकामी माननियांनी जाहिर प्रसिध्दिकरण करण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सोबत जोडण्यात आलेले जाहीर प्रसिध्दीकरण जादा खप असणाऱ्या एक स्थानिक व एक राज्यास्तरीय वृत्तपत्रातून एक वेळ प्रसिध्द करणेत यावेत.

संगणक प्रोग्रामर यांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण, विहित अटी व शर्ती सोबत जोडणेत आलेल्या असून त्या म.न.पा. संकेतस्थळावर प्रसिध्द करणेची कार्यवाही करावी.

13.08.21

(पुष्पगंधा भगत)
सहाय्यक आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका सोलापूर

**File No.SMC-11012(21)/137/2021-SMC-GAD**

<u>सोलापूर महानगरपालिका</u>

जा.क्र.सआम/कक्ष-1/आस्था-2/244
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर दि.13/08/2021
E- 27821

**-: जाहिरात :-**

**WALK - IN- INTERVIEW**

**दि.20/08 /2021, वेळ दुपारी 12.00 वाजता**

**( अर्ज स्विकारण्याची वेळ :- सकाळी 10.00 ते 12.00)**

**स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर.**

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभाग अंतर्गत प्राणी संग्रहालयाकरीता प्राणी संग्रहालय संचालक या पदी तात्पुरत्या स्वरुपात **सहा महिन्याच्या** कालावधी करीता खालील शैक्षणिक पात्रताधारण करणा-या पात्र उमेदवारांकडून अथवा सेवानिवृत्त शासकिय / निम शासकिय सेवेतून सेवा निवृत्त सेवकाकडून Walk - in-Interview व्दारे खालील शर्ती व अटीवर भरण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकवट वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | प्राणी संग्रहालय संचालक | 1 (एक) | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी एम.व्हि.एस.सी.<br>• अनुभव : प्राणी संग्राहलयाशी संबंधीत कामाचा 5 वर्षाचा अनुभवास प्राधान्य. | एकवट मानधन रुपये 30,000/- प्रति माह यावर सहा महिन्याच्या कालावधी करिता नियुक्ती राहील. सहा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल. |

**शर्ती व अटी :-**

1. मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - 2010/प्र.क्र.17/2000/12 दि.1 जुलै 2005 नुसार कुटुंबाची अट लागू असून त्यानुसार दि.28 मार्च 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवाराने सादर करावयाचे आहे.
2. आपली नियुक्ती ही एकवट मानधनावर असून पुर्णवेळ काम करण्याच्या अटीवर राहिल. ü सहा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल यांची नोंद घ्यावी.
3. संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करुन घेण्यात येईल.
4. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांच्या संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या एक सांक्षाकिंत प्रती, पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील तारखेस दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे.
5. उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहाणेचे आहे.
6. स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील सदर व इतर शर्ती

व अटी सो.म.पा.च्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले आहे.

7. कोणतेही कारण न देता निवड प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे/रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.
8. नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाव/गैरमार्गाचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्पावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.
9. सदरची नियुक्ती ही केवळ ठराविक कालावधी करीता व नमूद एकवट मानधनावर तात्पुरत्या स्वरूपाचे असल्याने नियुक्ती पूर्वी रु.100/- च्या स्टॅम्प पेपरवर सर्व शर्ती व अटी मान्य असलेबाबत प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.
10. इच्छुक उमेदवारांनी सदर दिवशी सकाळी 10 ते 12 या वेळेत अर्ज सादर करावा. कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी सोबत मूळ कागदपत्रे आणावी.

(पि.शिवशंकर, भा.प्र,से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका,

Signed by P.sivasankar
Date: 12-08-2021 10:47:08
Reason: Approved